दि.२८/११/२०१९

आज दि. २८/११/२०१९ रोजी पोलीस कर्तव्य मेळावा मधील स्पर्धेच्या चौथ्या दिवशी एकुण ३ स्पर्धा घेण्यात आल्या. त्यामध्ये १) 'सायंटिफिक एड टु इन्वेस्टिगेशन' यामध्ये फोरेन्सिक सायन्स लेखी परिक्षा, २) 'अॅन्टी सबोटेज' अ) लॉन/ग्राऊंड सर्च, ब)व्हेईकल सर्च, ३) 'पोलीस व्हिडीओग्राफी' या स्पर्धा आज घेण्यात आल्या.

सायंटिफिक एड टु इन्वेस्टिगेशन–फोरेन्सिक सायन्स लेखी परिक्षेमध्ये स्पर्धकाचे वैज्ञानिक पुरावा गोळा करण्याविषयीचे ज्ञान तपासले जाते.

आज झालेल्या 'सायंटिफिक एड टु इन्वेस्टिगेशन–फोरेन्सिक सायन्स लेखी परिक्षेमध्ये एकुण ५३ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धा प्रकारामध्ये नवी मुंबईचे सहा. पोलीस निरीक्षक अशोक फल्ले (३२.२५/५० गुण) यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तर पुणे शहरच्या सहा. पोलीस निरीक्षक अर्चना पाटील यांनी ( ३१.५०/५० गुण) व्दितीय क्रमांक मिळवला आणि कोकण परिक्षेत्राचे सहा. पोलीस निरीक्षक आर.के. खोपकर यांनी ( २९.२५/५० गुण)

तृतीय क्रमांक मिळवला. या स्पर्धेत अनुभवी खेळांडुमध्ये अटीतटीची लढत पाहण्यास मिळाली.

‘सायंटिफिक एड टु इन्वेस्टिगेशन स्पर्धाप्रकारामधील मेडीकोलिगल ओरल’ या विषयामध्ये मेडिकल सायंन्सचा तपासात कशा पध्दतीने वापर करून घेता येईल, याबाबतचे स्पर्धकाचे ज्ञान तोंडी परिक्षा घेवून तपासले जाते. यामध्ये बळीत व्यक्तीचे वैद्यकीय तपासणी करताना कोणकोणत्या गोष्टी तपासी अधिकाऱ्याने विचारात घेतल्या पाहिजे याबाबत प्रश्न विचारले जातात तसेच मृतदेहाचया शवविच्छेदनाच्या अहवालावर प्रश्न विचारले जातात. या स्पर्धा प्रकारामध्ये सर्व पोलीस अधिकाऱ्यांनी सर्वोत्तम कमगिरी दाखवली आहे. या मध्ये ए.टी.एस. चे पोलिस निरीक्षक निता मिसाळ यांनी (३५.५/५० गुण) यांनी सुवर्ण पदक मिळवले. तसेच मुंबई शहर चे पोलिस निरीक्षक संगिता देवकाते यांनी (३४.५/५० गुण) यांनी रौप्य पदक मिळवले आणि नागपूर रेंजचे प्रविण मुंडे (३४/५० गुण) यांनी कास्य पदक मिळवले.

‘ॲन्टी सबोटेज’ अ) लॉन/ग्राऊंड सर्च या स्पर्धेमध्ये १६०० स्क्वे. फुटचे लॉन असते. त्यामध्ये मिटींग प्लेस अरेंज करून त्या ठिकाणी घातपाती १० डिव्हाईस प्लॅन्ट केले

जातात. फ्लॅन्ट केलेल डिव्हाईस दोन स्पर्धकांनी मिळुन २० मिनीटात शोध घेवुन ते निकामी करावे लागतात. अशा स्पर्धांमुळे घातपातविरोधी कारवायांना कमी वेळेत शोधुन ते निकामी कसे केले जाते? याबाबतचे पोलीसांचे कौशल्य तपासले जाते. या स्पर्धा प्रकारात पुणे शहराने सर्वोत्तम कागमिरी करत पोना एस्.पी. हाबळे यांनी सुवर्णपदक व पोहवा पी.एस्. दोरजे यांनी रौप्यपदक पटकावले, तर कोल्हापुर परिक्षेत्राचे पोशि एस्. एस्. पांडव यांनी कांस्य पदक पटकावले.

ब) व्हेईकल सर्च या स्पर्धेमध्ये संशयीत वाहनांचे घातपात विरोधी यंत्रणेमार्फत कशी तपासणी करावी याबबात स्पर्धकाचे कौशल्य तपासाले जाते. त्याचप्रमाणे याचा फायदा पोलिसांना कायदा व सुव्यवस्था राखताना मिळून आलेल्या संशयीत वाहनांची तपासणी तसेच अति महत्वाच्या व्यक्तींची वाहने तपासणेकामी होतो. या स्पर्धेमध्ये एस.आर.पी.एफ. रेंज चे पोलीस नाईक एस.एस. गाडेकर (७४/१०० गुण) यांनी सर्वोत्तम गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. एस.आर.पी.एफ. रेंज चे पोलीस हवालदार एस.व्ही. गावस (७०/१०० गुण) यांनी गुणांसह व्दीतीय क्रमांक मिळवला तर फोर्स व नचे पोलीस शिपाई पी.पी. खेटाळे (५७/१०० गुण) यांनी

गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला. या स्पर्धे मध्ये एस.आर.पी. एफ. रेंजने सर्वोत्तम कामगिरीची नोंद केली आहे.

पोलीस व्हिडीओग्राफी चा उपयोग जेव्हा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवुन जमाव संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत असतो, तेव्हा व्हिडीओग्राफीद्वारे जमावाचे निरीक्षण करून त्यातुन प्रक्षोभक कृत्य करणा–या इसमांना अचुकपणे टिपुन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करणे पोलीसांना शक्य होते. ज्या ज्या वेळी बेकायदेशीर जमाव दंगल सदृश्य परिस्थिती निर्माण करतो, त्यावेळी व्हिडीओग्राफी हे पोलीसांचे आधुनिक शस्त्र बनुन पोलीसांना मदत करते. तसेच गुन्हयाच्या घटनास्थळावर दिसत्या परिस्थितीचे चित्रीकरण करून ते घटनास्थळाचा सबळ पुरावा म्हणुन मदत करते.

पोलीस व्हिडीओग्राफी या स्पर्धेमध्ये एकुण ४० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. यामध्ये सीआयडी पुणेच्या पोहवा कैलास बन्सल यांनी सर्वोत्तम कामगिरी करत ८९/१०० गुणांसह सुवर्णपदक पटकावले, तर कोल्हापुर परिक्षेत्राच्या पोहवा एस्.के. नागणे यांनी ८४/१०० गुणांसह रौप्यपदक मिळवले व नाशिक परिक्षेत्राचे ए.ए.गुंजाळ यांनी ८३/१००

गुणांसह कांस्यपदक मिळवले. या स्पर्धेत रौप्य व कांस्य पदकांसाठी अत्यंत चुरशीची लढत पाहण्यास मिळाली.

पोलीस कर्तव्य मेळाव्याचा समारोप समारंभ दि. ३०/११/२०१९ रोजी सायंकाळी ०३:५० वा. परेड ग्राऊंड, रा.रा.पो.बल गट क्र. २, रामटेकडी येथे आयोजित करण्यात आला असुन त्याचे प्रमुख पाहुणे मा. एस्.के.जायसवाल, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे आहेत.

तपास यंत्रणेमध्ये श्वान हे अत्यंत महत्वाची भुमिका बजावतात. या स्पर्धेमध्ये श्वान तपास करण्यासाठी सक्षम अहेत का ? या बाबत स्पर्धा घेतली जाते. या मध्ये श्वान किती चपळ आहे, तो त्याला खायला दिलेल्या वस्तूंशिवाय अन्य कोणत्या खाद्यपदार्थ खातो का ? याची शहानिशा केली जाते. तो त्याच्या हॅन्डलर शिवाय आणखी कोणाचे आदेश पाळतो का ? या गोष्टी तपासल्या जातात. तसेच संशयीत व्यक्तींचा माग घेवून, त्याला शोधण्याचे काम तो उत्तम रित्या जानतो का ? याचे परिक्षण केले जाते. घातपातामध्ये वापरण्यात येणारी स्फोटके तो जाणतो का ? तसेच वेगवेगळे आमली पदार्थ जाणतो का ? या बाबतची शहानीशा केली

जाते. या सर्व गोष्टींचा फायदा तपासादरम्यान क्लिष्ट गुन्हयांची उकल करण्यासाठी होतो.

डॉग स्कॉड कॉम्पीटीशन या स्पर्धा प्रकारामध्ये एक्सप्लोजीव्ह या विषयामध्ये एकुण १७ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. यामध्ये सोलापूर शहर चा श्वान मिरा, हीने सर्वोत्तम कामगिरी करत ३३९/४०० गुणांसह सुवर्णपदक पटकावले, तर पुणे शहर चा श्वान विराट याने २४८/४०० गुणांसह रौप्यपदक मिळवले व कोल्हापूर परिक्षेत्राचा श्वान रूद्र याने २०८/४०० गुणांसह कांस्यपदक मिळवले.

डॉग स्कॉड कॉम्पीटीशन या स्पर्धा प्रकारामध्ये नार्कोटीक्स या विषयामध्ये एकुण १४ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. यामध्ये नाशिक शहर चा श्वान मॅक्स, याने सर्वोत्तम कामगिरी करत ३२८/४२५ गुणांसह सुवर्णपदक पटकावले, तर अमरावती परिक्षेत्र ची श्वान ऐंजल हीने २५२/४२५ गुणांसह रौप्यपदक मिळवले व अमरावती शहर ची श्वान मोना हीने २४२/४२५ गुणांसह कांस्यपदक मिळवले.

डॉग स्कॉड कॉम्पीटीशन या स्पर्धा प्रकारामध्ये ट्रॅकिंग या विषयामध्ये एकुण ११ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. यामध्ये अमरावती परिक्षेत्र ची श्वान लुसी हीने सर्वोत्तम कामगिरी करत ३५०/४०० गुणांसह सुवर्णपदक पटकावले, तर नाशिक परिक्षेत्र चा श्वान टीपु याने २५०/४०० गुणांसह रौप्यपदक मिळवले व नाशिक शहर चा श्वान गुगल याने २०६/४०० गुणांसह कांस्यपदक मिळवले.


1
3
2


१७ वा महाराष्ट्र राज्य पोली
कर्तव्य मेळावा - २०१९ पुणे
(दिनांक २५ -
बर,२०१९)
१७ वा मह
पोलीस कर्तव्य मे
62nd AIPPM 2018 M
1
3
2


१७ वा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा - २०१९ पुणे
१७ वा
पोलीस कर्तव्य


१७ वा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा - २०१९ पुणे
(दिनांक २५ - ३० नोव्हेंबर,२०१९)


१७ वा महाराष्ट्र राज्य पोली
मेळावा - २०१९ पुणे
(दिनांक २५ - ३० न
२०१९)
१७ वा महाराष्ट्र राज्य
पोलीस कर्तव्य मेळावा २०१९,
62nd AIPPM 2018 MH WINNER TEAM
1
3
2


१७ वा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा - २०१९ पुणे


१७ वा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा - २०१९ पुणे
(दिनांक २५ - ३० नोव्हेंबर,२०१९)
१७ वा महाराष्ट्र
पोलीस कर्तव्य मेळावा
62" AIPPM 2018 MH WINNER